MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४९/२०१५-१६/२६७ दिनांक: १८/३/२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ४९/२०१५-२०१६**

१) श्री. गणपती सदा मलमे,
मु.पो.डफळापूर ता. जत,
जिल्हा-सांगली अर्जदार

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ.

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, जत.

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दि. ११.२.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे के.नं.४९/१५.१६ ची सुनावणी घेण्यांत आली. सदर सुनावणीस ग्राहक श्री. सदा बापू नाईक यांचे वतीने मुलगा श्री. गणपती सदा मलमे हे हजर होते. त्यांच्यासाठी ग्राहक प्रतिनिधी श्री. एच.डी. खापरे, उपस्थित होते. महावितरण तर्फे श्री. आर.आर. कुलकर्णी, क. अभियंता जत हे एकटेच महावितरणच्या वतीने हजर होते.

कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर महावितरण मंडल कार्यालय, सांगली आणि कार्यकारी अभियंता महावितरण कवठेमहंकाळ विभागीय कार्यालय यांचे वतीने कोणीही हजर नव्हते. अगर तसे पत्रही देण्यांत आलेले नव्हते. जत उपविभाग तर्फे ग्राहक तक्रार मंचास सादर केलेल्या पत्राची प्रत ग्राहकास देण्यांत आलेली नव्हती ती सुनावणी दरम्यान देण्यांत आली.

**-ग्राहकाची मागणी व तक्रारीचे स्वरुप-**

मूळ अर्जदार कै.सदा बापू नाईक (मलमे) यांनी यांचे नांवावर ग्राहक नं. २७१०००१०२९६६ या क्रमांकावर दि.११.२.२०१३ रोजी रु. ६,१००/- भरलेचे झेरॉक्ससह अर्जदार यांचा मुलगा श्री. गणपती सदा मलमे (नाईक) यांनी परिशिष्ट **अ** मध्ये दि. ११.१२.२०१५ रोजी अर्ज केला आहे. तो मंचास दि.१.१.२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. यामध्ये श्री. गणपती सदा मलमे यांनी डफळापूर ता.जत जिल्हा सांगली येथील ग.क्र. ३३२ मध्ये ५ अश्वशक्ती शेती पंपासाठी रु.६,१००/- हे पावती नं. ५२९०२१२ दि. ११.२.२०१३ या प्रमाणे भरले आहेत असे म्हंटले आहे. कृती मानके विनिमयानुसार वितरण वाहिन्याचा विस्तार असलेने हा वीज पुरवठा विनिमयाने निश्चित केलेल्या कालावधीत मिळवावयास हवा होता पण तो आज तागायत मिळाला नाही, असे म्हटंले आहे. तरी वीज जोडणी त्वरीत मिळावी विलंब झालेस भरपाईचा आदेश देण्याचे कायदेशीरता आहे. तरी तो अर्ज कोणाकडे करावा हे वितरण कंपनीने निश्चित करावे अशी मागणी ग्राहकातर्फे करण्यांत आलेली आहे. प्रत्यक्ष चर्चेवेळी उपस्थितीत अधिकारी श्री. कुलकर्णी यांनी असे सांगितले की, श्री.गणपती सदा नाईक मलमे यांनी श्री.सदा बापू नाईक यांचे वारसदार असल्याचे कोणताही कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही. तसेच एकापेक्षा अनेक वारसदार असू शकतात, त्यामुळे पहिल्यांदा वारसदार सिध्द करणे, गरजेचे आहे. त्यासाठी सदर व्यक्तीच्या नांवे अहवाल सादर करुन नांव बदली करुन घेणे आवश्यक आहे. मयताचे नांवे कनेकशन देता येत नाही. अशा अर्थाचे पत्रही त्याने मंचास सादर केलेले आहे. यांनी या पत्रात जेष्ठता यादीमध्ये सदर मयत व्यक्तीचे नाव ३०० नं. ला असून श्री. गणपती मलमे यांनी वारसदार असल्यास नांव बदली अहवाल सादर केल्यानंतर नांव बदली झाल्यानंतर जेष्ठता यादी प्रमाणे कनेकशन श्री. गणपती नाईक यांना देण्यांत येईल. तसेच श्री. सदा बापू नाईक यांचे जो कोणी वारसदार या कार्यालयास नांव बदली अहवाल प्रस्ताव कंपनीच्या नियमाप्रमाणे सादर करेल त्याच्या नांवे नांव बदली होईल आणि त्यांच्या नावावर जेष्ठता यादीनुसार कनेकशन देण्यांत येईल, म्हणून चलन भरलेली व्यक्ती मयत असलेले तक्रार फेटाळण्यांत यावी असेही त्याने पत्रात म्हंटले आहे. ग्राहकातर्फे आपली बाजू मांडताना श्री. खापरे यांनी महावितरणच्या अधिका-यांचे या बोलण्यास हरकत घेतली त्यांनी असे सांगितले की, ग्राहकाच्या वारसास वीज जोडणी मागण्याचा ग्राहक सरक्षण कायदयानुसार पूर्ण अधिकार आहे, त्यामुळे ग्राहकाची तक्रार फेटाळून लावता येणार नाही. मयत श्री. सदा बापू नाईक यांचे वतीने मुलगा म्हणून श्री. गणपती सदा मलमे वीज जोडणी मागण्यास कायदेशीररित्या पात्र आहेत. सबब अर्जदाराच्या मागणीनुसार त्याला वीज जोडणी मिळावयास हवी.

प्रत्यक्ष सुनावणी पूर्वी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष सांगली यांचा निकाल या कार्यालयाकडे प्राप्त झाला त्यामध्ये त्यांनी खालील प्रमाणे निर्णय दिला आहे.

अर्जदार यांनी वारसदार असल्याचे कागदपत्रे (पुरावे) तसेच आपल्या वडीलांच्या मृत्यूचा दाखला उपकार्यकारी अभियंता जत उपविभाग यांना सादर करावेत. महावितरण कंपनीचे नियमानुसार नांव बदली

करुन घ्यावेत. महावितरण कंपनीचे नियमानुसार आपले शेती पंप कनेक्शन जेष्ठता यादी प्रमाणे देण्यांत येईल वरील सर्व तपशील प्रत्यक्ष चर्चा याचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१. ग्राहकास वीज जोडणी देता येईल का?
उत्तर :- होय नियमाप्रमाणे.

**-कारण मिमांसा-**

ग्राहक प्रतिनिधी यांनी मांडलेली कायदेशीरता अंतर्गत तक्रार निवारण मंच, सांगली यांनी दिलेला निकाल आणि कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी यांनी मांडलेली बाजू या सर्वाचा विचार करता योग्य त्या कागद पत्रांची पूर्तता ग्राहकाने करुन देणे हे नियमाप्रमाणे आणि कायदेशीररित्या योग्य आहे असे मंचास वाटते अर्जदाराच्या वडीलांना दि. ११.२. २०१३ रोजी वीज जोडणीसाठी पैसे भरलेले आहेत, तसेच त्याच दिवशी त्यांनी कपॅसिटर साठीही पैसे भरलेचे दिसून येते मा. महाराष्ट्रवीज नियामक आयोग यांच्या विनिमयाप्रमाणे ग्राहकास यापूर्वी वीज जोडणी मिळणे कायदेशीररित्या व्हावयास हवे होते. पण ते झाल्याचे दिसून येत नाही.

अर्जदार श्री. गणपती सदा मलमे, नाईक यांनी कंपनीकडे अगर मंचाकडे वडीलाचा मृत्यूचा दाखला आणि वारसदार म्हणून ते अर्ज करण्यास पात्र आहेत यांचा पुरावा जर जोडला असता तर फार बरे झाले असते. उपविभाग जत यांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर ग्राहकास बोलावून योग्य त्या कागद पत्राची मागणी केली असती तर ते योग्य झाले असते जत उपविभागाने मंचास पाठविलेल्या उत्तराचे कॉपी ग्राहकास देणे अत्यावश्यक आहे असे लेखी सांगून सुध्दा दिली नाही ही गोष्ट मंचास आवडलेली नाही. येथूनपुढे योग्य ती खबरदारी घ्यावी असे मंच सूचीत करीत आहे.

तक्रारदार यांनी कनेक्शनसाठी योग्य त्या कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर जे वारस म्हणून अर्ज करण्यास पात्र असतील त्याची महसूल विभागाच्या नियमाप्रमाणे आणि मा. आयोगाच्या विनिमयाप्रमाणे सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन अर्जदारास त्वरीत विदयुत जोडणी दयावी असे मंचास वाटते. मयत अर्जदाराकडून जर वीज जोडणीचा A१ फॉर्म भरुन घेतला असेल तर त्याचेवर कॉलम नं. सी मध्ये कोणाचे नांव नामनिर्देश केलेले आहे. यांचाही विचार करावा. तक्रारदार यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मा. आयोगाच्या विदयुत पुरवठा सहिंता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनिमय २००५-२०१४ च्या कलम ४-४ नुसार वीज दराच्या प्रत्येक वर्गवारीतील प्रथम आलेल्यास प्रथम या तत्वावर विजेचा पुरवठा करण्यांत यावा आणि अधिनियमाच्या कलम ४३ व अधिनियमखाली करण्यांत आलेल्या विनिमयामध्ये नमूद केलेल्या काल मर्यादेत वीजेचा पुरवठा करणेचा बंधनास आधीन राहून वितरण परवानाधारक वीज पुरवठया बाबत वितरण परवाना धारकाच्या अन्य कोणत्याही खास योजने अंतर्गत वीजेची जोडणी देऊ शकेल या तरतूदीनुसार सर्व योग्य

कागद पत्राची पूर्तता केल्या नंतर अर्जदारांना त्वरीत वीज पुरवठा करण्यांत यावा. सर्व कागद पत्रांची पूर्तता केल्यानंतर त्या तारखे पासून तीन महिन्याच्या आंत श्री. मलमे यांना विदयुत पुरवठा करण्यांत यावा.

**-आदेश-**

१. तक्रारदार यांची वीज पुरवठयाची मागणी नियमाप्रमाणे मान्य करण्यांत येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.